


**दंत रोग चिकित्सा शिबिरास उदंड प्रतिसाद.**

**आज दि.27/12/2024 गंगाखेड येथील कै. सौ. सुशाबाई सीताराम मुंढे महाविद्‌यालयामध्ये राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने दंत रोग चिकित्सा शिबिर ठेवण्यात आले होते. या शिबिराला विद्‌यार्थ्यांचा उदंड प्रतिसाद मिळाला सदरील महाविद्‌यालय व संत जनाबाई विद्‌यालयातील विद्‌यार्थी व विद्‌यार्थिनी यांनी आपली दंत रोग चिकित्सा करून घेतली .**

**शिबिराच्या सुरुवातीला शिबिराचे उद्‌घाटन विद्‌यमान प्राचार्य डॉ. बालाजी ढाकणे यांनी केले. आपले दात सुरक्षित तर आपले आरोग्य सुरक्षित असा संदेश यावेळी ढाकणे सरांनी दिला. दाताचे आरोग्य काळजी व उपाय यावर डॉ. योगेश चाटे सविस्तर माहिती दिली**

**नंतर जवळपास 70 मुली व 80 मुले एकूण 150 विद्‌यार्थ्यांची यावेळी डॉ. योगेश चाटे यांनी दंतरोग चिकित्सा केली व प्रत्येक विद्‌यार्थ्यांला वेळ देऊन त्यांच्या दंत रोगाबद्‌दल सल्ला दिला.**

**यावेळी कार्यक्रमाचे प्रस्ताविक व आभार राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रमाधिकारी डॉ. अशोक केंद्रे यांनी केले. या कार्यक्रमाला विद्‌यार्थी प्राध्यापक यांनी सहकार्य केले..**






# देशोन्नती




गंगाखेड : शहरातील कै. सौ. शेषाबाई सिताराम मुंढे महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने दंत रोग चिकित्सा शिबिर घेण्यात आले या शिबिरात १५० विद्यार्थ्यांची तपासणी करण्यात आली.

Parbhani Edition
Dec 28, 2024 Page No. 2
Powered by: erelego.com

देशोन्नती

# दंतरोगचिकीत्सा शिबिरात 150 विद्यार्थ्यांची तपासणी

देशोन्नती वृत्तसंकलन

गंगाखेड : शहरातील कै. सौ. शेषाबाई सिताराम मुंडे महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने शुक्रवार २७ डिसेंबर रोजी आयोजीत दंत रोग चिकित्सा शिबिरात १५० विद्यार्थ्यांची तपासणी करण्यात आली.

राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने आयोजीत शिबिराचे उदघाटन प्राचार्य डॉ. बालाजी ढाकणे यांच्या हस्ते करण्यात आले. दंत रोग तज्ञ डॉ. योगेश चाटे यांनी दाताचे आरोग्य काळजी व उपाय यावर विद्यार्थ्यांना सविस्तर माहिती देत प्रत्येक विद्यार्थ्यांला वेळ देऊन ७० विद्यार्थिनी व ८० विद्यार्थी असे एकूण १५० विद्यार्थ्यांची दंतरोग चिकित्सा करून दंत रोगाबद्दल सल्ला दिला. आपले दात सुरक्षित तर आरोग्य सुरक्षित असा संदेश प्राचार्य ढाकणे यांनी दिला. या शिबिराला कै. सौ. शेषाबाई सिताराम मुंडे महाविद्यालय व संत जनाबाई विद्यालयातील विद्यार्थ्यांनी प्रतिसाद देऊन दंतरोग चिकित्सा करून घेतली. कार्यक्रमाचे प्रस्ताविक व आभार राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी प्रा. डॉ. अशोक केंद्रे यांनी केले.

Parbhani Edition
Dec 28, 2024 Page No. 2
Powered by: erelego.com